# विभागाची औद्योगिक ध्येय धोरणे

## १. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण -२०१५

माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण -२०१५ हे दिनांक २५/०८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आले.

**धोरणाची ठळक वैशिष्टे व लक्षांक**

- महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्रातील अग्रस्थान कायम राखणे
- राज्यातील औद्योगिकदृष्टया कमी विकसित भागात आणखी गुंतवणूकीचा ओघ वाढविण्यासाठी चालना देणे
- राज्याच्या सर्व भागातील, समाजाच्या सर्व स्तरातील शिक्षित तरुणांना अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे
- निर्यात उलाढालीतील उच्च पातळी गाठून त्याद्वारे राज्याच्या स्थूल घरगुती उत्पादनात आणि उत्पादकतेत वाढ घडवून आणणे
- राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासाकरीता एक साधन म्हणून माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वापर करणे
- मूळ सामुग्री निर्मितीसह नवीन उत्पादन व बिझनेस टु बिझनेस आणि बिझनेस टु कस्टमर यांना पुरविल्या जाणाऱ्या अद्वीतीय सेवांकरीता बौध्दीक मत्ता निर्मितीस प्रोत्साहन देणे.

**धोरणाचे लक्षांक :-**

- धोरण कालावधीत माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक तसेच माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या स्थापनेसाठी रु. ५०,००० कोटी इतकी गुंतवूणक आकर्षित करणे
- १० दशलक्ष नवीन रोजगार निर्माण करणे
- महाराष्ट्र राज्यात या क्षेत्रातील वार्षिक निर्यात रु. १,००,००० कोटी पर्यंत वाढविणे.

## माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०१५ ची यशोगाथा

माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण -२०१५ हे दिनांक २५/०८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आले. मा.तं.व मा.तं.स.से.धोरण -२०१५ च्या धोरण कालावधीमध्ये रु. ५०,००० कोटी इतकी गुंतवणूक आकर्षित करण्याचे लक्षांक निश्चित करण्यात आले असताना धोरण कालावध्यीमध्ये रु. ६१,८७२ कोटी इतकी गुंतवणूक झाली. त्याचप्रमाणे १० लक्ष नवीन रोजगार निर्मितीचे लक्ष ठेवले असताना प्रत्यक्षात २३.३५ लक्ष रोजगार निर्मिती झाली. तसेच राज्यातून या क्षेत्रातील वार्षिक निर्यात रु. १,००,००० कोटी पर्यंत वाढविण्याचे लक्षांक ठेवण्यात आले असताना रु. १,४७,००० कोटी इतकी निर्यात करण्यात आली आहे. मा.त.व मा.तं.स.से. धोरण-२०१५ च्या कालावधीत आजतागायत राज्यात ९९ नवीन खाजगी माहिती तंत्रज्ञना उद्यानांना इरादापत्र देण्यात आले अ सून ४९ खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानाची नोंदणी झालेली आहे. त्याद्वारे ४२,८०,५४४.६४ चौ.मी इतके बांधीव क्षेत्र तयार झाले आहे.

## २. राज्याचे किरकोळ व्यापार धोरण-२०१६

राज्याचे किरकोळ व्यापार धोरण २०१६ हे दिनांक १०/०२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे. **धोरणाची कार्यतंत्रे** :-

अ)रोजगाराच्या संधींची निर्मिती,

ब) तळातील (ग्रास रुट) उद्योजकतेचे प्रवर्तन,

क)महिलांचे सबलीकरण,

ड) शेतकऱ्यांचे सबलीकरण,

इ ) "मेड इन इंडिया" वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांसाठी मागणी निर्माण करणे आणि त्यांना समर्थन पुरविणे

फ) किरकोळ व्यापारातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची वाढ,

ग) सरकारी तिजोरीत (Excheque) भर,

ह) भाव स्थिर राखणे आणि ग्राहकांना विविध वस्तु प्रस्तुत करणे,

**धोरणाची ठळक वैशिष्टे**

अ) देशांतर्गत महाराष्ट्राचे किरकोळ व्यापार क्षेत्रात अग्रस्थान प्रस्थापित करणे.

ब) राज्यातील कमी विकसित विभागात गुंतवणूकीचा ओघ आणखी वाढविण्यासाठी चालना देणे.

क) राज्याच्या सर्व विभागातील, समाजाच्या सर्व स्तरातील, विशेषत: ग्रामिण भागातील तरुणांना किरकोळ व्यापारक्षेत्रात शिक्षित करुन रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करणे.

ड) राज्याच्या सामाजिक-आर्थिक विकासाकरिता किरकोळ व्यापार क्षेत्राचा एक साधन म्हणून वापरणे.

इ) जागतिकीकरणाला तोंड देण्यासाठी अस्तित्वात असलेल्या असंघटीत लहान किरकोळ विक्रेत्यांचे बळकटीकरण करणे.

## राज्याचे किरकोळ व्यापार धोरण-२०१६ ची यशोगाथा

राज्याचे किरकोळ व्यापार धोरण -२०१६ हे दिनांक १०/०२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आले आहे. धोरण कालावधीत एकूण १५ किरकोळ व्यापाऱ्यांमार्फत राज्यात एकूण १५०० किरकोळ दुकाने स्थापित करण्यात आली असून, त्याद्वारे अंदाजे एकूण १८ हजार कोटी एवढी गुंतवणूक झाली असल्याचे व ३० टक्के एवढया दराने रोजगार निर्मितीत वाढ झाली आहे. तसेच धोरण कालावधीमध्ये राज्यात किरकोळ व्यापारामध्ये अंदाजे एकूण ५४,५६,३७६ इतकी आस्थापना निर्मिती झाली आहे. तसेच अंदाजे ९६,९९,४५५ एवढी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती झाली आहे.

## ३. महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण- २०१६ FAB प्रकल्पाकरिता प्रोत्साहने

इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राच्या विकासासाठी व या उद्योगांना अनुकूल ठरेल असे राज्याचे इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनासाठी स्वतंत्र धोरण आखणे आवश्यक असल्याने, महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक धोरण-२०१६ हे दिनांक ११/०४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे.

❖ **महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक धोरण-२०१६ ची उद्दिष्टे :-**

१)गुंतवणूकदारांना गुंतवणूक करण्याकरिता अनुकूल वातावरण निर्माण करून राज्यात, इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचे उत्पादन करण्यास चालना देणे.

२) राज्यातील इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राची रचना व अभियांत्रिकी यामध्ये नवनवीन बदल करून राज्यात संशोधन व विकास प्रणाली निर्माण करून इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राचा शाश्वत विकास करण्यास सक्रीयपणे सहाय्य करणे.

३) इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योग या क्षेत्राशी संबंधित कौशल्यवृध्दी व प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेणे.

४) राज्यात इलेक्ट्रॉनिक्स उत्पादक उद्योग घटक स्थापन करण्यासाठी एक खिडकी योजना सुरू करणे व संदर्भात क्षमताधिष्ठित (Potential) गुंतवणूकदारांना सामना करावा लागणाऱ्या समस्यांचे सर्वतोपरी निराकरण करुन त्यांना जमीन, ऊर्जा, पाणी इत्यादींसारख्या आवश्यक पायाभूत सेवा-सुविधा उपलब्ध करून देणे.

५) इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योग क्षेत्राकरिता कुशल मनुष्यबळाची उपलब्धता वाढविण्यासाठी या क्षेत्राशी निगडीत असलेल्या औद्योगिक हितसंबंधितांच्या सक्रिय सहयोगाने या क्षेत्रात प्रभावी पावले उचलण्यासाठी पुढाकार घेणे.

६) इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योग व नॅनो इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील संशोधन व विकासासाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करून इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योग क्षेत्रात बौध्दिक मालमत्ता निर्मितीस चालना देणे.

७)इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योग क्षेत्रातील विनिर्दिष्ट गरजा भागविण्याकरिता शासनांतर्गत विशेष शासन व्यवस्था निर्माण करणे.

८)केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या निदेशानुसार शास्त्रोक्त पद्धतीचा वापर करुन या उद्योगामुळे निर्माण होणा-या इ-कचऱ्याची_ विल्हेवाट व व्यवस्थापन करण्यासाठी अत्युत्तम पध्दती (Best Practices) अंगीकृत करण्यास गती देणे.

❖ **महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६ चे लक्ष्यांक :**

अ) २०२० पर्यंत ३०० कोटी डॉलर्स इतक्या गुंतवणुकीसह १२०० कोटी डॉलर्स इतक्या उलाढालीचे लक्ष्य ठेवून जागतिक स्तरावर इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योगाकरिता सर्वमान्य हब (HUB) म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण करणे व या क्षेत्रात १ लाख अतिरिक्त रोजगार निर्माण करणे.

ब) २०२० पर्यंत इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योग क्षेत्रातील आयातीतील पर्याय २०० कोटी डॉलर्स पर्यंत वाढविणे.

## महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण- २०१६ FAB प्रकल्पाकरिता प्रोत्साहने ची यशोगाथा

महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण -२०१६ चा कालावधी हा दिनांक ११/०४/२०१६ चा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून पाच वर्षे पर्यंत होता. तथापि, मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने सदर धोरणाचा कालावधीहा दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २१/०१/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. धोरण कालावधीत सन २०१६ ते सप्टेंबर २०२० या कालावधीत राज्यामध्ये

इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील २९ घटक स्थापित झाले असून, त्यांची एकूण गुंतवणूक अंदाजे रु. ३३५८४१.३७ कोटी इतकी आहे. तसेच ११५३५ इतकी रोजगार निर्मिती झाली आहे.

## ४. <u>महाराष्ट्राचे अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण-२०१८</u>

**धोरणाची पार्श्वभूमी :-**

संरक्षण क्षेत्रावर करण्यात येत असलेल्या खर्चाच्या निकषानुसार जगातील अव्वल १० देशामध्ये भारताचा समावेश होतो. सन २०१४ या वर्षामध्ये भारताने या क्षेत्रासाठी ४५२० कोटी अमेरिकन डॉलर्स खर्च केले असून हे प्रमाण भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या २.२१ टक्के इतके आहे. गेल्या दशकात भारताचा संरक्षण क्षेत्रावरील वार्षिक खर्च २३१ टक्क्यांनी वाढला आहे. आगामी दशकात हा खर्च दुप्पटीने वाएन १२००० कोटी अमेरिकन डॉलर्स होणे अपेक्षित आहे. सद्यस्थितीत देशाच्या संरक्षण क्षेत्राची सुमारे ७० टक्के इतकी गरज ही आयातीद्वारे भागविली जाते. भारत सरकार संरक्षण क्षेत्रासाठी केली जाणारी आयात ३० टक्के पर्यंत घटविण्यासाठी प्रयत्नशील आहे. जागतिक अवकाश उद्योग हा सुमारे १.०० लक्ष कोटी अमेरिकन डॉलर इतका अंदाजित असून त्यामध्ये ३ ते ४ टक्क्यांनी वार्षिक वृध्दी होत आहे. या वृध्दीचा बहुतांश भाग हा भारतासारख्या विकसनशील देशांच्या बाजारपेठेच्या विस्तारामुळे साध्य होणार म्हणून अवकाश क्षेत्रातील बाजारपेठेमध्ये १० टक्क्यांपेक्षा जास्त दराने वृध्दी होणे अपेक्षित आहे.

भारत सरकारने मेक इन इंडिया या अभियानामध्ये अवकाश आणि संरक्षण क्षेत्रातील उत्पादन उद्योगाला एक महत्वाचे उत्पादन क्षेत्र म्हणून स्थान दिलेले आहे. महाराष्ट्र शासनही या संधीचा लाभ घेऊन अवकाश आणि संरक्षण उत्पादन क्षेत्रातील गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी उत्सूक आहे. महाराष्ट्र राज्याला अवकाश आणि संरक्षण क्षेत्रामधील देशी/भारतीय बनावटीच्या उत्पादनासाठी अधिक पसंती असणारे राज्य बनविणे, देशी आणि आधुनिक तंत्रज्ञान क्षमता वाढीस चालना देणे, जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ निर्माण करणे तसेच अवकाश आणि संरक्षण क्षेत्रामधील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग यांना जागतिक स्पर्धात्मक वातावरणासाठी सक्षम करण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्राचे नवीन अवकाश आणि संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण -२०१८ हे दिनांक १४/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे.

❖ **महाराष्ट्र अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण - २०१८ ची उद्दिष्टे :-**

- पुढील पाच वर्षात अवकाश आणि संरक्षण क्षेत्रामध्ये २०० कोटी अमेरीकन डॉलर इतकी गुंतवणूक आकर्षित करणे.
- उद्योगांच्या सहभागाने जागतिक दर्जाचे कौशल्य असणारे कुशल मनुष्यबळ विकसित करणे.
- पुढील पाच वर्षात १ लाख रोजगार निर्माण करणे.
- अवकाश आणि संरक्षण क्षेत्रासाठी देशी प्रगत तंत्रज्ञान विकसित करण्यास चालना देणे.
- संरक्षण क्षेत्रातील सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (MSMEs) जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनविणे.

## ५. <u>महाराष्ट्राचे लॉजिस्टीक पार्क धोरण -२०१८</u>

**धोरणाची पार्श्वभूमी :-**

लॉजिस्टीकला आंतरराष्ट्रीय सेवेचा दर्जा मिळाला असून जागतिक व्यापाराद्वारे देशाला परकीय चलन मिळवून देण्याची क्षमता त्यामध्ये निर्माण झाली आहे. तसेच मा.पंतप्रधानांच्या "मेक इन इंडिया" हया महत्वाकांक्षी योजनेच्या यशस्वितेसाठी देशाला आपल्या लॉजिस्टीकमध्ये अद्ययावता आणावी लागणार आहे. हया क्षेत्राला जागेची उपलब्धता, कुशल मनुष्यबळाचा अभाव, रस्ते, रेल्वे,बंदरे विमातळ आणि अन्य अनेक मुलभूत संरचनेचा अभाव इत्यादी समस्यांनी ग्रासले आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वात जास्त औद्योगिकीकरण झालेले व ग्राहक असलेले राज्य असल्यामुळे राज्याच्या सर्वसमावेशक आर्थिक प्रगतीसाठी वरील समस्यांकडे त्वरित लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. लॉजिस्टीक क्षेत्रापुढील समस्या निवारण करण्यासाठी त्याचप्रमाणे महाराष्ट्राला जागतिक साखळीचा भाग बनविणे, पारंपारिक गोदामांना अद्ययावतता आणून त्यांचे पूर्णत: एकीकृत असलेल्या व मूल्यवर्धीत लॉजिस्टीक करणा-या सेवेमध्ये रुपांतर करणे, कार्यक्षमतेत सुधारणा व लॉजिस्टीक खर्चात कपात करणे या उद्येशाने महाराष्ट्राचे लॉजिस्टीक पार्क (Logistic Parks) धोरण-२०१८ हे दिनांक १४/०२/२०१८ च्या शासन निर्णयानुसार जाहीर करण्यात आले आहे.

**धोरणाची उद्दिष्टये :-**

- महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचा एक भाग बनविणे
- पारंपारिक गोदामांना अद्ययावता आणून त्याचे पूर्णत: एकीकृत असलेल्या व मूल्यवर्धित लॉजिस्टीक करणाऱ्या सेवेमध्ये रुपांतर करणे
- कार्यक्षमतेत सुधारणा व लॉजिस्टीक खर्चात कपात
- राज्यातील लॉजिस्टीक क्षेत्रातील एकूण पायाभूत सुविधा सुधारून शेवटच्या टोकापर्यंत जोडून घेणे
- राज्यातील लॉजिस्टीक समूह निर्माण करणे व किमान २५ पूर्णपणे एकीकृत बहुविध लॉजिस्टीक पार्क तयार करणे

किमान १०० लॉजिस्टीक पार्कचे प्रवर्तन करणे

## ६. रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरीता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले (Parks)/धोरण- २०१८

**धोरणाची पार्श्वभूमी :-**

रेडिमेड गारमेंट उत्पादन क्षेत्र हा वस्त्रोद्योग किंमत साखळीतील अंतिम टप्प्या आहेत व मूल्यवृध्दीमध्ये त्यांचे सर्वाधिक योगदान आहे. कमी भांडवली गुंतवणूक आणि जास्त कामगारांची आवश्यकता असलेले हे क्षेत्र आहे. रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता असल्या कारणाने रेडिमेड गारमेंट निर्मिती उद्योग क्षेत्रास भक्कम पाठींबा देण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील विकसनशील प्रदेशांतील दरडोई उत्पन्नात वाढ होण्यासाठी उपयुक्त ठरणारी ही बाब आहे. मराठवाडा व विदर्भ या कापूस उत्पादक पट्टयामध्ये मोठया प्रमाणावर उत्पादन आधारीत रोजगार निर्माण करण्यासाठी हे क्षेत्र उपयुक्त ठरणारे आहे. जेम्स अँड ज्वेलरी या क्षेत्राचा भारताच्या जीडीपी मधील वाटा ६.७ टक्के इतका आहे आणि भारताच्या परकीय चलन मिळकतीमध्ये फार मोठा सहभाग आहे.

महाराष्ट्र विशेषत: मुंबई हे हिरे व्यापार,डायमंड कटींग आणि चकाकी जडजवाहिर उत्पादन आणि निर्यात यासाठी हिरे व्यपाराचे प्रमुख केंद्र आहे. देशाची इलेक्ट्रॉनिक्स हार्डवेअरची गरज फार मोठी असून,आता या क्षेत्रातील मागणीची पूर्तता करण्यासाठी उत्पादकता वाढीस चालना देण्यात येत आहे. इलेक्ट्रॉनिक्स हार्डवेअर व सूक्ष्म अभियांत्रिकी घटक हे विशेषत: नागरी भागात स्थित असल्याने व मोठया प्रमाणात कामगार वर्गास रोजगार पूरवित असल्याने या क्षेत्रांच्या गरजा सारख्याच आहेत. या घटकाच्या वाढीमध्ये उत्पादनासाठी किफायतशीर दरात जमिनी मिळविणे हे मोठे आव्हान आहे. या आव्हानांवर मात करण्याकरीता रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरीता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले (Parks)/**धोरण-** २०१८ **हे दिनांक** १४/०२/२०१८ **च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे**.

**धोरणाची उद्दिष्टये :-**

- महाराष्ट्राला जागतिक रेडिमेड गारमेंट उत्पादन आणि लोकप्रिय झालेले ब्रँडस् यांचेसाठी सर्वाधिक पसंती असलेले ठिकाण बनविणे. तसेच सूक्ष्म,लघू व मध्यम उपक्रम जे या क्षेत्राचा एक मोठा हिस्सा आहे त्यांची मोठ्या प्रमाणात वाढ आणि विकास करण्यासाठी सुलभीकरण करणे.
- जागेच्या उपलब्धतेशी संबंधित त्यांच्या प्रमुख बाबींबाबत विचार करुन संपूर्ण कामगारांच्या क्षेत्रासाठी जोमदार वातावरणाची निर्मिती करणे.
- जेम्स व ज्वेलरी उत्पादन आणि निर्मीतीत महाराष्ट्र हे महत्वाचे केंद्र असून, या विभागातील वाढ आणि रोजगार निर्मिती क्षमतेची महत्तम पातळी गाठण्यासाठी सदर धोरणान्वये सुलभीकरण करणे.
- सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक व अभियांत्रिक घटकाकरीता फ्लॅटेड गाळा उपलब्ध् करून या क्षेत्राकरीता प्रोत्साहीत करणे.

## ७.<u>महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण -२०१९</u>

महाराष्ट्र राज्याचा समतोल औद्योगिक विकास घडविण्यासाठी व त्याद्वारे आर्थिक विकास साधण्यासाठी आणि नवीन उद्योग घटकांच्या स्थापनेस चालना देण्यासाठी व रोजगाराच्या भरीव संधी निर्माण होण्यासाठी महाराष्ट्र नवीन औद्योगिक धोरण-२०१९ शासन दिनांक ०७/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे.

**धोरणाचे लक्षांक :-**

- ❖ राज्यातील एकूण ढोबळ उत्पादनात उत्पादन क्षेत्राच्या वाढीचा दर १२ ते १३ टक्के वरुन वाढविणे.
- ❖ जेणेकरुन राज्याच्या सकल उत्पादनात त्याचा हिस्सा सन २०२३-२४ पर्यंत २५ टक्यांपर्यंत नेणे.
- ❖ सन २०२३-२४ पर्यंत रु.१० लाख कोटी एवढया मुल्याची गुंतवणूक आकर्षित करणे.
- ❖ सन २०२३-२४ पर्यंत ४० लाख लोकांसाठी रोजगारांच्या संधी निर्माण करणे .

**धोरणाची वैशिष्टये :-**

उदयोन्मुख उच्च तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांकडे औद्योगिक विकास वळविण्यासाठी व रोजगार निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने थ्रस्ट सेक्टरला प्राधान्य दिले आहे. थ्रस्ट सेक्टर मधील मोठ्या, विशाल व अतिविशाल प्रकल्पांना जागावाटपामध्ये व प्रोत्साहनामध्ये प्राधान्य देण्यात येणार आहे.

- ❖ विद्युत वाहने (उत्पादन, पायाभूत सुविधा व देखभाल)
- ❖ हवाई व संरक्षण उत्पादन उद्योग
- ❖ उद्योग ४.० (कृत्रिम बुध्दीमत्ता, त्रिमिती छपाई, महाजाल, यंत्रमानव विज्ञान, अतिसूक्ष्म तंत्रज्ञान इत्यादी)
- ❖ एकात्मिक डेटा सेंटर पार्क्स (आयडीसीपी) स्थापनेस प्रोत्साहन
- ❖ वस्त्रोद्योग यंत्रसामुग्रीचे उत्पादन
- ❖ जैव तंत्रज्ञान, वैद्यकीय निदान उपकरणे.
- ❖ कृषी व अन्न प्रक्रिया उद्याने (फक्त द्वितीय व तृतीय अन्न प्रक्रिया उद्याने)
- ❖ माहिती तंत्रज्ञान (IT) व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (ITeS)
- ❖ इलेक्ट्रॉनिक प्रणाली संरचना व उत्पादन (ESDM) व सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन (FAB)
- ❖ उद्योग, तांत्रिक संस्था व कौशल्य विकास विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधून कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यास प्रोत्साहन देणे.
- ❖ अविकसित विभागांमध्ये उद्योग स्थापन करण्याकरीता विशेष आर्थिक प्रोत्साहन देणे.
- ❖ अंतिम टप्प्याच्या जोडणीसाठी (last mile connectivity) निर्णायक पायाभूत सुविधा निधी (Critical Industrial Infrastructure Fund) निर्माण करणे.
- ❖ खाजगी औद्योगिक उद्यानांमध्ये पूरक पायाभूत सुविधा निर्माण करणे.
- ❖ सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून फ्लॅटेड गाळ्यांची निर्मिती विशेष वाहन हेतू धर्तीवर करण्यात येईल
- ❖ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग तसेच महिला व अनुसूचित जाती / अनुसूचित जमातींमधील उद्योजकांसाठीच्या औद्योगिक क्षेत्रांमधील पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन देणे.
- ❖ आजारी व बंद पडलेल्या उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी पाठबळ देणे.
- ❖ राज्यातील वेअरहाऊसिंग व लॉजिस्टिक सुविधांच्या विकासासाठी एमआयडीसी किमान ५०० एकर औद्योगिक क्षेत्र आरक्षित करुन ठेवेल.

❖ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रांच्या धर्तीवर, सर्व सहकारी औद्योगिक वसाहतींमध्ये मुलभूत चटई क्षेत्र निर्देशांकाच्या वर ५० टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र अनुज्ञेय राहील.

❖ हरित औद्योगिकीकरणासाठी प्रोत्साहन देऊन पर्यावरणदृष्टया शाश्वतता सुनिश्चित करणे.

१) संशोधन व विकास आणि स्टार्टअपमध्ये गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे.

२) इज ऑफ डुइंग बिझनेसला चालना देणे, राज्याशी संबंधित सर्व सेवा व मंजुऱ्या एकाच ठिकाणी मिळवून देण्यासाठी "मैत्री" ही एक खिडकी योजना अधिक सक्षम करणे.

३) गुंतवणूक आणि निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय परिषदांची स्थापना करणे.

४) महाराष्ट्र राज्य रोजगार निर्मिती योजनेव्दारे (MEGP) राज्याच्या लघु व मध्यम उद्योगांसाठीच्या नवीन फ्लॅगशिप योजनेचा शुभारंभ करुन मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

५) ५.२.१०सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी व लहान प्रकल्पांसाठी विशेष आर्थिक सवलतींची योजना तयार करणे.

६) औद्योगिक समुह विकसनाव्दारे जास्त रोजगार निर्मितीची क्षमता असलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे सबलीकरण करणे.

७) तंत्रज्ञानाचा स्वीकार व प्रसार, बाजारपेठ विश्लेषण, प्रशिक्षण इत्यादीसह अनेक बाबींमध्ये सुधारणा होण्याकरीता सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना संस्थात्मक पाठबळ देणे.

८) रोजगार निर्मितीवर आधारित विशाल व अतिविशाल उद्योगांना अतिरिक्त आर्थिक पाठबळ देऊन वाढीव रोजगार निर्मितीस हातभार लावणे.

९) उद्योग, तांत्रिक संस्था व कौशल्य विकास विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधून कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यास प्रोत्साहन देणे.

१०) अविकसित विभागांमध्ये उद्योग स्थापन करण्याकरीता विशेष आर्थिक प्रोत्साहन देणे.

११)अंतिम टप्प्याच्या जोडणीसाठी (last mile connectivity) निर्णायक पायाभूत सुविधा निधी (Critical Industrial Infrastructure Fund) निर्माण करणे.

१२) खाजगी औद्योगिक उद्यानांमध्ये पूरक पायाभूत सुविधा निर्माण करणे.

१३) सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग तसेच महिला व अनुसूचित जाती / अनुसूचित जमातींमधील उद्योजकांसाठीच्या औद्योगिक क्षेत्रांमधील पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन देणे.

१४) आजारी व बंद पडलेल्या उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी पाठबळ देणे.

१५) हरित औद्योगिकीकरणासाठी प्रोत्साहन देऊन पर्यावरणदृष्टया शाश्वतता सुनिश्चित करणे.